"In Pursuit of Global Competitiveness"
# शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय
स्टेशन रोड, उस्मानपुरा, छत्रपती संभाजीनगर – ४३१ ००५
(महाराष्ट्र शासनाची स्वायत्त संस्था)
फोन – (०२४०)२३६६१०४ , २३३४३४८ फॅक्स – (०२४०) २३३२८३५
E-Mail – principalgeca@yahoo.com Web – http://www.geca.ac.in

जाक./शाअमछसं/लेखा/२०२४/ 544
दिनांक:– 17 FEB 2024

परिपत्रक
कालमर्यादित

**विषय:– आर्थिक वर्ष २०२३–२०२४ चे आयकर विवरणपत्र सादर करणे बाबत.**

या संस्थेतील सर्व अधिकरी/कर्मचारी यांना या परिपत्रकानुसार कळविण्यात येते की, आयकर गणना विवरणपत्र नमुना **(old Tax Regime)** संस्थेच्या **www.geca.ac.in** या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आलेले आहे. त्यांचे २०२३–२०२४ या आर्थिक वर्षातील **वर्ग १ ते ४ यांचे अद्यावत** वेतन व इतर मानधनाचे विवरणपत्र तयार करण्यात आलेले आहे. ते लेखा विभागातून हस्तगत करावे. त्यानुसार आर्थिक वर्ष २०२३ –२४ मध्ये मिळणा–या वेतन व भत्ते, **वैदयकीय प्रतिपुर्ती** रक्कम तसेच त्यांच्या बॅक खात्यावर जमा करण्यात आलेल्या इतर मानधनाची शाहानिशा करावी. सदरील रक्कमेवरील आयकर गणनाकरुन **आयकर गणना विवरणपत्र बचतीच्या आवश्यक पुराव्यासह (०२ प्रतित) उशीरात उशीरा दि. २६ फेब्रुवारी २०२४ पर्यत भरणा करून थेट लेखा विभागात सादर करावेत.** विहीत कालमर्यदेत अधिकरी व कर्मचारी यांनी विवरणपत्रे लेखा विभागास सादर करून सहकार्य करावे जेणेकरून सादर करण्यात आलेल्या विवरणपत्रांची गणना करून माहे फेब्रुवारी २०२४ चे वेतन लवकरात लवकर अदा करणे सुलभ होईल. जे अधिकारी/कर्मचारी विहीत कालमर्यदेत आयकर विवरणपत्र सादर करणार नाही त्यांचे माहे फेब्रुवारी २०२४ वेतन थोपविण्यात येईल याची नोंद घ्यावी.

वेतनाचे वार्षिक विवरणपत्र सन २०२३.२४ तयार करण्यात आले असून सदरचे विवरणपत्र लेखा विभागातून दिनांक १५.०२.२०२४ पासून हस्तगत करावे.
आयकर विभाग, भारत सरकार व्दारा आर्थिक वर्ष २०२३–२४ करीता आयकरदात्याकरीता आयकर गणना चे **old Tax Regime** व **New Tax Regime** असे दोन पर्याय देण्यात आले असुन आपणास जो सोईचा असे त्यानुसार आयकर गणना करून विवरणपत्र कार्यालयात सादर करावे.

सर्व विभाग प्रमुख यांनी सदर परिपत्रक त्यांच्या अधिपत्याखालील कार्यरत असलेले अधिकारी व कर्मचारी यांच्या निदर्शनास आणुन त्यांची स्वाक्षरी घ्यावी व तसा अहवाल कार्यालयास सादर करावा.

सर्व अधिकरी/कर्मचारी यांना कळविण्यात येते की, संस्थेच्या टॅन क्रमांक अंतर्गत वेतनातूनच आयकर कपात करणे बंधनकारक राहील. चालनाव्दारे आयकर भरणा करण्यास परवानगी नाही याची सर्वानी नोंद घ्यावी.

डॉ.संजय एस.डंभारे
**प्राचार्य**
**शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय,**
**छत्रपती संभाजीनगर**

प्रत:– १.सर्व विभाग प्रमुख यांना माहिती व योग्य त्या कार्यवाहीकरीता.
२.संकेतस्थळावर प्रकाशनाकरीता.

(स्थापत्य/विदुयत/अणुविदयुत/संगणक/माहिती तंत्रज्ञान/भौतिकशास्त्र/रसायनशास्त्र/गणित/यंत्र/ कर्मशाळा/ एम.सी.ए./उपयोजित यंत्र/ग्रंथालय/भांडारपाल/टीपीओ/जिमखाना/परिक्षा विभाग/कार्यालय/वस्तीगृह)